**भारत-चीन सीमाविषयक प्रश्नावर विशेष प्रतिनिधी आणि चीनचे परराष्ट्र मंत्री यांची भेट**

19 ऑगस्ट 2025

विशेष प्रतिनिधी आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांच्या आमंत्रणावरून चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या (CPC) केंद्रीय समितीच्या राजकीय ब्युरोचे सदस्य आणि चीनच्या लोकप्रजासत्ताकाचे परराष्ट्र मंत्री श्री. वांग यी यांनी 18-19 ऑगस्ट 2025 रोजी भारताला औपचारिक भेट दिली.

भेटीदरम्यान, परराष्ट्र मंत्री वांग यांनी 19 ऑगस्ट 2025 रोजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री. अजित डोवाल यांच्यासोबत भारत-चीन सीमाविषयक प्रश्नावर विशेष प्रतिनिधींच्या संवादाच्या 24व्या फेरीचे संयुक्त अध्यक्षस्थान भूषविले. तसेच, 18 ऑगस्ट 2025 रोजी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा देखील केली. तसेच, त्यांनी 19 ऑगस्ट 2025 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली.

कझान येथे झालेल्या महत्त्वपूर्ण नेतृत्व-स्तरीय सहमतीच्या अंमलबजावणीत झालेल्या प्रगतीबाबत उभय बाजूंनी सकारात्मक चर्चा केली. उभय बाजूंनी हे मत व्यक्त केले की 23व्या विशेष प्रतिनिधींच्या चर्चेनंतर भारत-चीन सीमावर्ती भागात शांतता आणि स्थिरता कायम राखण्यात आली आहे. भारत-चीन द्विपक्षीय संबंधांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी सीमावर्ती भागात शांतता आणि स्थिरता राखण्याच्या महत्त्वाला उभय बाजूंनी दुजोरा दिला.

उभय देशांच्या नेत्यांच्या धोरणात्मक मार्गदर्शनाखाली आणि सकारात्मक तसेच रचनात्मक दृष्टिकोनातून, भारत-चीन सीमाविषयक प्रश्नावर उभय बाजूंमध्ये स्पष्ट आणि सखोल विचारविनिमय झाला. यामध्ये दोन्ही विशेष प्रतिनिधींनी पुढील मुद्द्यांवर सहमती दर्शविली:

1. सीमाविषयक प्रश्नाचे समाधान करताना भारत-चीन सीमाविषयक प्रश्नाच्या समाधानासाठी निश्चित केलेल्या 'राजकीय निकष व मार्गदर्शक तत्वांच्या 2005 मध्ये स्वाक्षरी करण्यात आलेल्या करारानुसार न्याय्य, वाजवी आणि परस्पर स्वीकारार्ह चौकट तयार करण्यासाठी, एकंदर द्विपक्षीय संबंधांचा राजकीय दृष्टिकोन ठेवण्याची आवश्यकता असल्यावर उभय बाजूंनी भर दिला.

2. भारत-चीन सीमाविषयक सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्यरत यंत्रणा (WMCC) अंतर्गत एक तज्ज्ञ गट स्थापन करण्यावर सहमती दर्शविण्यात आली, जो भारत-चीन सीमावर्ती भागात सीमारेषा ठरविण्याच्या प्रक्रियेत प्रारंभिक प्रगती साध्य करण्याच्या दृष्टीने अभ्यास करेल;

3. भारत-चीन सीमावर्ती भागात शांतता आणि स्थैर्य कायम राखण्यासाठी प्रभावी सीमा व्यवस्थापन पुढे नेण्यासाठी, WMCC अंतर्गत एक कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला

4. आधीच अस्तित्वात असलेल्या पश्चिमी विभागातील सामान्य स्तरावरील यंत्रणेव्यतिरिक्त, पूर्व आणि मध्य विभागांमध्येही सामान्य स्तरावरील यंत्रणा निर्माण करण्याचा निर्णय घेतला असून, पश्चिम विभागातील सामान्य स्तरावरील यंत्रणेची लवकर बैठक घेण्याचे ठरले आहे.

5. सीमा व्यवस्थापन प्रक्रियेला पुढे नेण्यासाठी राजनैतिक आणि लष्करी स्तरावरील सीमा व्यवस्थापन यंत्रणांचा उपयोग करणे, आणि तणाव कमी करण्यासंदर्भात चर्चा करणे — त्यासाठी आवश्यक तत्त्वे व कार्यपद्धती यांपासून सुरूवात करणे.

उभय बाजूंनी पुढील विशेष प्रतिनिधींच्या चर्चांची फेरी परस्पर सोयीस्कर वेळी चीनमध्ये आयोजित करण्यावर देखील सहमती दर्शविली.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या बैठकीत, उभय पक्षांनी द्विपक्षीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय विषयांवर सकारात्मक, रचनात्मक आणि पुरोगामी चर्चा केली आणि लोककेंद्रित व आर्थिक संवादावर पुढील समजुती आणि फलनिष्पत्ती/व्यवहार्य पावले यावर सहमती दर्शविली:

1. उभय बाजूंनी हे अधोरेखित केले की भारत आणि चीनच्या नेत्यांच्या धोरणात्मक मार्गदर्शनाची भारत-चीन संबंधांच्या विकासात अपरिहार्य आणि अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. भारत आणि चीन यांच्यातील स्थिर, सहकार्यपूर्ण आणि पुरोगामी संबंध हे उभय देशांच्या परस्पर हिताचे असून त्यांच्या विकासाच्या पूर्ण क्षमतेची पूर्तता करण्यासाठी उपयुक्त आहेत, यावर त्यांनी सहमती दर्शविली. त्यांनी यावरही सहमती दर्शवली की उभय बाजूंनी दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या महत्त्वपूर्ण सामायिक समजुतींची प्रामाणिक अंमलबजावणी करावी आणि भारत-चीन संबंधांचा सातत्यपूर्ण, सकारात्मक आणि स्थिर विकास करावा.

2. टियांजिनमध्ये होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटना (SCO) शिखर परिषदेत भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहभागाचे चीनच्या बाजूने स्वागत केले. भारतीय बाजूने चीनच्या SCO अध्यक्षपदाला आपला पूर्ण पाठिंबा पुन्हा स्पष्ट केला आणि फलदायी निष्कर्षांसह यशस्वी शिखर परिषदेची अपेक्षा व्यक्त केली.

3. उभय बाजूंनी यशस्वी राजनैतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी एकमेकांना पाठिंबा देण्यास सहमती दर्शविली. चीनची बाजू 2026 ब्रिक्स शिखर परिषदेचे आयोजन करण्यासाठी भारताला सहाय्य करेल. भारतीय बाजू 2027 ब्रिक्स शिखर परिषदेचे आयोजन करण्यात चीनला सहाय्य करेल.

4. उभय बाजूंनी विविध अधिकृत द्विपक्षीय संवाद यंत्रणा आणि देवाणघेवाणींचा शोध घेण्यास व त्यांना पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शविली, जेणेकरून सहकार्य वाढवता येईल, परस्पर चिंता दूर करता येतील आणि मतभेदांचे योग्य व्यवस्थापन करता येईल. यामध्ये 2026 मध्ये भारतात भारत-चीन परस्पर नागरिक देवाणघेवाणींच्या उच्चस्तरीय यंत्रणेच्या तिसऱ्या बैठकीच्या आयोजनाचा देखील समावेश आहे.

5. उभय बाजूंनी 2025 मध्ये भारत आणि चीन यांच्यातील राजनैतिक संबंध प्रस्थापनेच्या 75व्या वर्षपूर्ती निमित्त आयोजित कार्यक्रमांमध्ये परस्परांना पाठिंबा देत राहण्यावर सहमती दर्शविली.

6. उभय बाजूंनी चीनी मुख्य भूभाग आणि भारत यांच्यातील थेट विमान सेवा लवकरात लवकर पुन्हा सुरू करण्यावर आणि अद्ययावत हवाई सेवा करार अंतिम करण्यावर सहमती दर्शविली. दोन्ही दिशेने पर्यटक, व्यवसाय, माध्यम आणि इतर अभ्यागतांना व्हिसा सुविधा देण्यावर देखील त्यांनी सहमती दर्शविली.

7. उभय बाजूंनी 2026 पासून तिबेट स्वायत्त प्रदेशातील चीनमधील कैलास पर्वत / गंग रिनपोचे आणि मानसरोवर / मापाम युन त्सो येथे होणाऱ्या भारतीय यात्रेचे आयोजन सुरू ठेवण्यास आणि तिचा विस्तार करण्यास सहमती दर्शविली आहे.

8. उभय बाजूंनी आंतरसीमा नद्यांवरील सहकार्याबाबत विचारविनिमय केला आणि भारत-चीन आंतरसीमा नद्या तज्ज्ञ स्तर यंत्रणेची भूमिका पूर्णपणे बजावण्यास तसेच संबंधित सामंजस्य करारांचे नूतनीकरण करण्याबाबत संवाद सुरू ठेवण्यास सहमती दर्शविली. मानवीय दृष्टिकोनातून आपत्कालीन परिस्थितींमध्ये जलसांख्यिकी माहिती सामायिक करण्यास चीनने सहमती दर्शविली.

9. उभय बाजूंनी लिपुलेख पास, शिपकी ला पास आणि नाथू ला पास या तीन नियुक्त व्यापारी मार्गांद्वारे सीमाव्यापार पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शविली.

10.  उभय बाजूंनी व्यापार आणि गुंतवणुकीचा प्रवाह सुलभ करण्यासाठी ठोस उपाययोजना करून तो सुलभ करण्यास सहमती दर्शविली.

11.  उभय बाजूंनी मैत्रीपूर्ण चर्चा करून सीमावर्ती भागात शांतता आणि सुव्यवस्था संयुक्तरित्या कायम राखण्यास सहमती दर्शविली.

12.  उभय बाजूंनी बहुपक्षीयतेला प्रोत्साहन देण्यास, प्रमुख आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक विषयांवर परस्पर संवाद वाढविण्यास, WTO केंद्रस्थानी असलेल्या नियमाधारित बहुपक्षीय व्यापार प्रणालीचे संरक्षण करण्यास आणि विकसनशील देशांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या बहुध्रुवीय जगाच्या प्रोत्साहनासाठी सहमती दर्शविली.

**नवी दिल्ली**

**19 ऑगस्ट 2025**